**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई.**
**यांचे कार्यालय**
**कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.**
**दुरध्वनी क्रं. ०२२ - २७५७४९६५**

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/ ८८४ /सन-२०१६
दिनांक ३/१० /२०१६

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदी

२) मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण ,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडील दिनांक १९/१२/२०१५ रोजीचे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश

३) श्री. अनिल व्ही तिर्लोटकर ( प्राधिकृत अधिकारी ) यांचा दिनांक ६/९/२०१६ रोजी प्राप्त झालेला अहवाल

४) या कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये दिनांक १४/९/२०१६ रोजी देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस

५) या कार्यालयाकडून दिनांक २७/९/२०१६ रोजी घेण्यात आलेली सुनावणी

ज्याअर्थी संगम निवास को ऑप हौसिंग सोसा लि, कोकण नगर,भांडुप (प) मुंबई -७८ ( या संस्थेच्या नावाने वाचावे ) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे आणि,

ज्याअर्थी सदरची गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायदा व मंजूर उपविधीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असल्याने तिचे कामकाज हे सहकारी कायदा व मंजूर उपविधी व सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी पारीत परीपत्रकानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेच्या कार्यरत व्यवस्थापक समितीचा कार्यकाळ संपत असल्याचे संस्थेने सादर केलेल्या अहवालानुसार या कार्यालयाच्या निदर्शनास आले .त्याअनुषंगाने सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक घेणेकामी मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाकडे वर्ग केली असता सदर कार्यालयाकडून वाचावे क्रमांक २ नुसार श्री. अनिल व्ही तिर्लोटकर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली .आणि,

ज्याअर्थी पुढील निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्याकामी नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी सदरच्या संस्थांना भेट देवून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळवूनही संस्था अथवा व्यवस्थापक

Scanned by CamScanner

समिती पदाधिकारी कोणताही प्रतिसाद देत नसल्याचा अहवाल वाचावे क्रमांक ३ नुसार अहवाल या कार्यालयात सादर केला आणि,

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर संस्थेच्या कार्यरत व्यवस्थापक समितीचा कार्यकाळ संपुनही नवीन व्यवस्थापक समितीची निवड करण्याकरीता आवश्यक कार्यवाही व संस्थेची व्यवस्थापक कमिटी बेकायदेशीररीत्या कामकाज करीत असल्याचे व संस्था ९७ व्या घटना दुरुस्तीमधील निवडणुक नियमांचे पालन करीत नसल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आल्याने या कार्यालयाकडून वाचावे क्रमांक ४ अन्वये कलम ७७ अन्वये दिनांक १४/९/२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस पारीत करुन दिनांक २७/९/२०१६ रोजी निवडणुकीसंदर्भात आपले लेखी अथवा तोंडी म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयात सुनावणी आयोजीत करण्यात आली होती आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेला निवडणुकीसंदर्भात लेखी व तोंडी म्हणणे मांडण्याची संधी देवूनही या कायालयाकडून दिनांक २७/९/२०१६ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीवेळी संस्थेच्या वतीने कुणीही पदाधिकारी अथवा प्रतिनिधी हजर नाहीत अथवा कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नाही .त्यामुळे संस्थेची कार्यरत व्यवस्थापक समितीचा कार्यकाळ संपुनही अनधिकृतपणे कामकाज करीत असून ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार निवडणुक नियमांचे पालन करीत नसल्याची या कार्यालयाची खात्री झाल्याने संस्थेच्या व सभासदांच्या हितास बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने कार्यरत व्यवस्थापक समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज व नवीन व्यवस्थापक समितीची निवडणुक प्रक्रियाबाबत कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे .अशी माझ ी खात्री झाल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे .

:- आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये मी संध्या बावनकुळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एस विभाग, मुंबई व्दारा संगम निवास को ऑप हौसिंग सोसा लि, कोकण नगर,भांडुप (प) मुंबई -७८ या संस्थेची कार्यरत व्यवस्थापक समिती बरखास्त करुन श्री आनंद म्होळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे .

सदरचा आदेश आज दिनांक ३ /१०/२०१६ रोजी माझ्या सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत करण्यात येत आहे .

(संध्या बावनकुळे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

प्रत माहितीकरीता रवाना :-

१) चेअरमन/सेक्रेटरी, संगम निवास को ऑप हौसिंग सोसा लि, कोकण नगर,भांडुप (प) मुंबई -७८

२/- आपणास कळविण्यात येते की आपण संस्थेच्या संपुर्ण दप्तराचा व मालमत्तेचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देण्यात यावा.



Scanned by CamScanner

२) श्री आनंद पुंडलिक म्होळे, प्राधिकृत अधिकारी

३) मा.अध्यक्ष, मुंबई जिल्हा को ऑप.हौसिंग फेडरेशन लि, १०३ विकास प्रिमायसेस,१ ला मजला,बँक स्ट्रीट,फोर्ट,मुंबई -१

४) शाखाधिकारी ,मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि/ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि शाखा -
-----------

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

Scanned by CamScanner